# मराठी विभाग वार्षिक अहवाल

२०२३-२४

**दिनांक : ९ ऑक्टबर २०२३ - सुलेखन कार्यशाळा**


पदवी व पदवीयुत्तर मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विभागातील विद्यार्थिनींसाठी सुलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी विभागातील सर्व विद्यार्थीनी उपस्थिती असून त्यांनी सुंदर लेखन कसे करावे याचे प्रशिक्षण घेतले. त्याचबरोबर लेखन करताना कोणते नियम पाळावे हे देखील विद्यार्थिनी सांगण्यात आले.




भोवतालच्या कलांकडे विद्यार्थिनींना सजगतेने पाहता यावे आणि यातूनच त्यांचे अक्षर वळणदार ,सुंदर व्हावे यासाठी नाविन्यपूर्ण अशा कार्यक्रमात सर जे.जे स्कूल ऑफ आर्ट्स येथून पदवी

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

घेतलेल्या अनुभवी कलाशिक्षिका सौ. दीप्ती बारवाल तसेच एस.एन. डीटीच्या चर्चगेट परिसरातील महाविद्यालयातील  प्रा.जोगदंड सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.




विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना दीप्ती बारवाल यांच्या मते "सुलेखन करताना आपल्या भावनांची जाणिव वाचणाऱ्यांना व्हावी इतकी कलात्मकता त्या अक्षरांमध्ये असावी. सुवाच्च अक्षर रेखाटण्यासाठी नक्कीच अशा कार्यशाळांची मदत होते. "ही महत्त्वपूर्ण बाब त्यांनी नोंदविली .या उपक्रमाच्या निमित्ताने जागतिक टपाल दिन' साजरा करीत विद्यार्थिनींनी ११६ पोस्ट कार्ड्स वर "संस्कृता स्त्री पराशक्ती" हे विद्यापीठाचे ब्रीदवाक्य, कवितेच्या ओळी, तसेच काहींना उद्देशून पत्रे देखील लिहिली. या कार्यशाळेसाठी मराठी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. माधुरी सुटे आणि विद्यार्थिनींचा सक्रिय सहभाग होता.

**दिनांक : २१ ऑगस्ट २०२३ - काव्यावर्षा - पावसाळी**

विभागातील मुलांना निसर्गाशी जोडता यावे आणि त्यातून निसर्गाची नव्याने ओळख व्हावी. साहित्यात हा निसर्ग कसा येतो? त्याची रूपके कोणती? या साऱ्यांची विद्यार्थ्यांनाओळख व्हावी म्हणून काव्यवर्षा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पावसाच्या कविता म्हटल्या. पाऊस आणि कविता यांचे नाते विद्यार्थ्यांनी समजून घेतले.

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

Scanned with OKEN Scanner



विद्यापीठाच्या सन्माननीय कुलगुरू प्रोफेसर डॉ.उज्वला चक्रदेव मॅडम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. डॉ.अरुणा दुभाषी मॅडम यांच्या हस्ते सन्माननीय कुलगुरूंचे शाल,श्रीफळ व ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले. आणि सन्माननीय कुलगुरूंनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले आणि काही सुंदर कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.सुनिल रामटेके सर यांनी केले आणि निवेदन डॉ.अनुराधा पोतदार मॅडम यांनी केले.



यावेळी डॉ.माधुरी सुटे आणि डॉ.मोनिका राऊत यांच्यासह विविध महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. गुजराती, हिंदी तसेच इंग्रजी विभागातील विद्यार्थिनींनीही कविता सादर केल्या आणि काही विद्यार्थिनींनी काव्यगायन केले. काहींनी स्वलिखित कविता सादर केल्या. विद्यार्थिनींच्या कार्यक्रमाचे निवेदन विद्यार्थिनी श्रुती रसाळ हिने केले.

**दिनांक : ४ जानेवारी २०२४ - विद्याधर गोखले : व्यक्ती आणि साहित्य**

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

Scanned with OKEN Scanner

श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या मराठी विभागाने 'विद्याधर गोखले : व्यक्ती आणि साहित्य' हे एकदिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध नाटककार मा. अरुण नलावडे हे लाभले होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून संगीत आणि नाट्यशास्त्र अभ्यासक मा. शुभदा दादरकर या उपस्थित होत्या. या चर्चासत्राचे स्वागतपर भाषण साहित्य अकादमीचे प्रभारी अधिकारी मा. ओम प्रकाश नागर यांनी केले तर प्रस्तावना साहित्य अकादमीचे केंद्रीय कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. नरेन्द्र पाठक यांनी केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू मा. उज्वला चक्रादेव या होत्या.



अभिराम भडकमकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिले सत्र झाले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान नरेन्द्र पाठक यांनी भुषविले. विद्याधर गोखले यांची "नाट्यसृष्टी" आणि संगीत नाटक यावर सना पंडित व प्रमोद बापट यांनी शोधनिबंध सादर करून श्रोत्यांना गोखले यांच्या लेखनशैलीची ओळख करून दिली. तसेच गोखले यांची पत्रकारिता आणि त्यांचे "कथात्मक साहित्य" या विषयावर श्रीराम शिधये आणि मीनाक्षी बऱ्हाटे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

**दिनांक: ५ फेब्रुवारी २०२४ - 'ओळख मराठी विश्वकोशाची'**

श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठाच्या इतिहास विभाग, मराठी विभाग आणि एस.एन.डी.टी.आर्ट्स अँड एससीबी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स, चर्चगेट यांच्या संयुक्त विद्यमाने

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

Scanned with OKEN Scanner

दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ रोजी ‘ओळख मराठी विश्वकोशाची’ ही एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या एकदिवसीय कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.श्री.म.तथा राजा दीक्षित (अध्यक्ष, मराठी विश्वकोश मंडळ, मुंबई व वाई) हे लाभले होते तर अध्यक्ष म्हणून डॉ. उज्वला चक्रदेव. (कुलगुरू, श्री.ना.दा. ठा. महिला विद्यापीठ. मुंबई) या उपस्थित होत्या. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जास्वंदी वांबूरकर आणि मराठी पदव्युत्तर विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुनील रामटेक हे देखील उपस्थित होते. या चर्चासत्र महाविद्यालयातील मराठीच्या विभागप्रमुख डॉ. माधुरी सुटे आणि विद्यार्थिनींचा सक्रिय सहभाग होता.

**दिनांक : २७ फेब्रुवारी २०२४ – मराठी भाषा गौरवदीन**

पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठात मराठी भाषा गौरवदीन साजरा केला. त्यावेळी महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम प्रसिद्ध हास्य कलावंत समीर चौघुले यांची मुलाखत घेण्यात आली. कलावंत आणि साहित्य यांचे नाते समजून घेताना साहित्य हे कलेचेच एक महत्त्वाचे अंग आहे. हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर कोकणात आजपासून ४००-४५० वर्षांपासून चित्रकथी ह्या लोककलेच्या माध्यमातून विविध पुरातन, पौराणिक कथा-लोककथा सादर व्हायच्या. परंपरागत चालत आलेल्या चित्रकथीचे, त्यातल्या चित्रांना आणि कथानकाला घेऊन काही नियम आणि संकेत आहेत. चित्रकथीच्या खेळात जितकं महत्व कथनाला तितकंच पद्य, संगीत आणि चित्रांना. ह्याच धरतीवर ‘चित्रकथी’ ह्या लोकप्रकारापासून प्रेरित होऊन ‘मिथ ऑफ मँडीगोज्’ हा एका नवीन धाटणीचा खेळ विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला.

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

Scanned with OKEN Scanner



हा खेळ देवेंद्र अहिरवार ह्यांच्या कवितेवर आधारित होता. या कार्यक्रमात मराठीच्या विभागप्रमुख डॉ. माधुरी सुटे आणि विद्यार्थिनींचा सक्रिय सहभाग होता.

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

Scanned with OKEN Scanner




उद्घाटन सत्राचे निवेदन डॉ. राजश्री कुलकर्णी यानी तर द्वितीय सत्राचे निवेदन डॉ. अनुराधा पोतदार यांनी केले. डॉ. सुनील रामटेके यांनी आभार मानले. या चर्चासत्र महाविद्यालयातील मराठीच्या विभागप्रमुख डॉ. माधुरी सुटे आणि विद्यार्थिनींचा सक्रिय सहभाग होता.

Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

Scanned with OKEN Scanner